# तात्पुरती कार्यावली

## सोमवार, दिनांक १ मार्च २०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२१ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची तात्पुरती कार्यावली.

**एक** : राज्यपालांचे अभिभाषण.

**दोन** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवणे.

**तीन** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शानाचा प्रस्ताव.

**चार** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**पाच** : प्रश्नोत्तरे.

**सहा** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**सात** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**आठ** : सन २०२१-२०२२ चा अर्थसंकल्प सादर करणे व त्यावर सर्वसाधारण चर्चा करणे.

**नऊ** : सन २०२०-२०२१ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**दहा** : अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**अकरा** : पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**बारा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**तेरा** : शासकीय विधेयक.

**चौदा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**पंधरा** : शोक प्रस्ताव.

**सोळा** : इतर प्रस्ताव.

**सतरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प. नियम ९७ अन्वये.

**अठरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे मंत्र्याचे लक्ष वेधणे-म.वि.प.नियम १०१ अन्वये.

**एकोणीस** : **अशासकीय विधेयके-विचारार्थ—**

**(१)** सन २०१९ चे वि.प.वि.क्रमांक २ – महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) (सुधारणा) विधेयक, २०१९-**श्री. नागोराव गाणार, वि.प.स. यांचे**

**(२)** सन २०२० चे वि.प.वि. क्रमांक १ – महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) विधेयक, २०२०-**श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचे**

**(३)** सन २०२० चे वि.प.वि. क्रमांक २ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२० — **श्री. नागोराव गाणार, वि.प.स. यांचे**

**(४)** सन २०२० चे वि.प.वि. क्रमांक ३ – महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक, २०२०-**श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचे**

**(५)** सन २०२० चे वि.प.वि. क्रमांक ४ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०२० — **श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचे**

**वीस :** अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२)

**श्री. विलास पोतनीस वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १, २, ४ व ५**

(१) " राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशासकीय सेवेसंदर्भातील प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२) " राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात आणि सर्व स्तरावरील न्यायालयात, तसेच राज्याच्या एकंदरीत शासकीय व्यवहारांमध्ये मराठी भाषेचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्याची जबाबदारी राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपवावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४) " राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू निर्माण करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत तसेच अशा केंद्रांना अद्ययावत क्रीडा साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५) " राज्यात पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी पर्यटकांसाठी मार्गदर्शक नेमणे व अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन त्या माध्यमातून तेथील युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील सर्व पर्यटन स्थळांचे महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९, १०, ११ व १२**

(९) " राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे व दुर्गांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१०) " राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(११) " राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरू करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१२) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले आहेत. या कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले आहे. त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर विपरीत परिणाम झाला आहे. हे लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्या सोडविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. नागोराव गाणार वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १४, १५, १६ व १७**

(१४) " राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटत आहे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१५) " राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी ह्या सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१६) " महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, विद्यार्थ्यांच्या राज्यभर जिल्हास्तरीय क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक नाट्य, वादविवाद स्पर्धा शासनातर्फे आयोजित केल्या जातात, या विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था होत नसल्यामुळे स्पर्धेचे यशस्वी आयोजन होत नाही, त्यामुळे या विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, त्यांची होणारी गैरसोय टाळण्याकरिता व स्पर्धांचे आयोजन योग्यरितीने होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले विद्यार्थी भवन बांधून त्यांची योग्य ती देखभाल करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१७) " महाराष्ट्र राज्यातील कायम विनाअनुदान तत्वावरील सन २००१ पूर्वी मान्यता असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयी सुविधासाठी महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान प्रदान करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. महादेव जानकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २१ व २२**

(२१) " राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास, परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२२) “ राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदुषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांना दुषित पाणी पिण्याची वेळ येत असून आजुबाजूच्या रहिवाश्यांच्या आरोग्यावर तसेच मच्छिमार बांधवाच्या उपजीविकेच्या साधनांवर व नद्यांमध्ये पाणी पिण्यास येणाऱ्या जनावरांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदुषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. अशोक *ऊर्फ* भाई जगताप वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २५, २६, २७ व २८**

(२५) “ मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२६) “ केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडेगांवाना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पादंण रस्तादुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२७) “ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या धर्तीवर कोकण प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याबाबत राज्य शासनाने कार्यवाही करून त्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२८) “ राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

## डॉ. वजाहत मिर्झा वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २९, ३० व ३१

(२९) "राज्यात अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांची अवस्था चिंताजनक आहे, या समाजात शिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने हा समाज विकासापासून वंचित आहे, राज्य शासनाच्या अनेक योजना या समाजापर्यंत पोहोचत नसल्याने या समाजाला अनेक लाभ मिळत नाहीत, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ हे फक्त नावापुरते उरलेले आहे, या महामंडळाद्वारे एकाही ठिकाणी एकही व्यवसायिक व थेट कर्ज पूर्ण करण्यात आले नाही, मागील तीन वर्षांपासून या महामंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली नसून शासनाकडून या महामंडळास निधीही उपलब्ध करून दिला जात नाही, तसेच या समाजातील हजारो विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून शिष्यवृत्ती देखील मिळत नाही, शाळांना योग्य अनुदान देखील मिळत नसल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात देखील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी मागास राहत आहेत, यामुळे या समाजातील नागरिकांच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामध्ये वाढ होऊन हा समाज विकासापासून दूरच राहिला आहे, या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उत्कर्षासाठी शासनाने अधिकाधिक प्रभावी उपाययोजना आखाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३०) "राज्यात अनेक ठिकाणी पाणी टंचाईची स्थिती निर्माण झाली असून, ग्रामीण भागातील नागरिकांना चार-पाच मैल दूरवरुन पाणी आणण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. पावसाळ्यातील पाण्याची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भीषण पाणीटंचाई परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती ही अतिशय गंभीर बाब झालेली आहे, त्यावर जलतज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळी उपाययोजना करण्याची आवश्यकता, (उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग) परंतु याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नाही, महाराष्ट्रातील सर्व शासकीय इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करून त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता आहे, शहरी भागांमध्ये हॉटेल्स, रेस्टॉरंट व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये पाण्याचा अपव्यय होताना दिसतो, तो देखील टाळण्याची आवश्यकता आहे, अशा अनेक उपाययोजना केल्यास राज्यात पिण्यासाठी, शेतीसाठी औद्योगिक कामांसाठी यामुळे जलस्त्रोत रिचार्ज होऊन परिणामी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, यासाठी शासकीय आस्थापनांना निर्देश द्यावेत, तसेच खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी जसे इतर बाबी तपासण्यात येतात तसेच (ग्रामपंचायत ते महानगरपालिका) त्या इमारतीवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजन आहे किंवा कसे हे तपासूनच बांधकाम परवाना द्यावा अशा सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाने निर्गमित कराव्यात व अशाप्रकारे विविध उपाययोजना करून पावसाचे पाणी व वैयक्तिक वापरासाठी असलेले पाणी यांचे योग्य नियोजन करण्यासाठी शासनाने अधिकाधिक उपाययोजना कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३१) “ राज्यातील विनाअनुदान तत्त्वावरील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्त्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी ह्या सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. अमरनाथ राजूरकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३४, ३५, ३६ व ३७**

(३४) “ राज्यात वेळोवेळी पडणाऱ्या दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, पावसाळा संपत असतानाच पुढील वर्षभरासाठी राज्यातील पाणीसाठा जतन करण्याची आवश्यकता, राज्यातील जनतेला लागणारे पिण्याचे पाणी, शेतीसाठी लागणारे पाणी, औद्योगिक वसाहती व कारखान्यांना आणि अन्य घटकांना लागणाऱ्या पाण्याचे न्याय वाटप होऊन प्रत्येकाला पुरेसे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुरुवातीपासूनच विभागवार घेतली जाणारी पिके त्या भागातील उपलब्ध पाणीसाठा व लोकसंख्या यांचा विचार करून प्रत्येक घटकाला वर्षभर पाणी कसे पुरेल याबाबत पूर्वनियोजन करून त्याची शासन स्तरावर काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३५) “ राज्यात विशेषत: मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरुपी उपाययोजना, मराठवाड्यात शाश्वत शेतीसाठी सिंचन अभियान सुरु करून मराठवाड्यातील सिंचनाचा जलआराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३६) “ राज्यातील विशेषत: मराठवाड्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीसाठी योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करून आवश्यक असेल तेथे नद्या, खाड्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३७) “ राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले आहेत. या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषत: कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले आहे. त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर विपरीत परिणाम झाला आहे. हे लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्या सोडविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(शा.म.मु.) एचबी ११०९-३ (२५०-२-२०२१)

**श्री. शरद रणपिसे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३९ व ४०**

(३९) "चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी लागू करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, या निर्णयामुळे जनमानसांत उमटलेली समाधानाची भावना, दारु सारख्या व्यसनामुळे व्यसनाधीन व्यक्तींचे उध्वस्त झालेले संसार, या व्यसनामुळे तरुण पिढी वाममार्गाला जात आहे, त्यांना त्यापासून परावृत्त करणे आवश्यक आहे, तरुण पिढीचे भवितव्य अंध:कारमय होऊ नये यावर उपाय म्हणून संपूर्ण राज्यात दारुबंदी धोरण अंमलात आणावे अशी समाजाच्या विविध स्तरातून होत असलेली मागणी, या बाबी विचारात घेता संपूर्ण राज्यात दारुबंदी धोरण राबविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४०) "राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर यासह बहुसंख्य शहरांची लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढत आहे, या शहरांच्या विविध भागात दरवर्षी वाढत असलेले कचऱ्याचे ढीग, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात महानगरपालिकांना येत असलेले अपयश, कचऱ्यांच्या ढिगांमुळे अनेक भागात रोगराई पसरुन नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, दुर्गंधी पसरल्यामुळे रस्त्यावरुन नागरीकांना जाणे येणे कठीण झाले आहे, महानगरपालिकांनी यावर परिणामकारक उपाययोजना आखण्याची आवश्यकता असतानाही त्यांच्याकडून तशी कार्यवाही होत नाही, नागरीकांच्या आरोग्याशी हा प्रश्न निगडीत असल्यामुळे शासन स्तरावरुन यात लक्ष घालण्याची आवश्यकता विचारात घेता कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी परिणामकारक व कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावेत, असे आदेश सर्व महानगरपालिकांना शासनाने द्यावेत व त्यानुसार परिणामकारक अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी शासनस्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अंबादास दानवे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४२, ४३, ४४ व ४५**

(४२) "राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील सर्व गांवे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे व ग्रामीण भागातील रस्ते दुरूस्ती करून वाहतुकीयोग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि जिल्हा स्तरावर रस्त्याच्या अंतराच्या प्रमाणात ग्रामीण रस्त्याच्या दुरूस्ती आणि मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४३) "राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे व दुर्गांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४४) " राज्यात उद्योग जगतात मोठ्याप्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरूणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरूणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४५) " राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्याप्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत जोडणी मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे व फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. सुधीर तांबे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४६, ४७ व ४८**

(४६) " राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक, प्रभावी होण्यासाठी आणि भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी सर्व शिक्षण विभाग (शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, आश्रमशाळा, अंध, अपंग, मूक-बधिर शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे मंत्रालयातील एकाच विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४७) " राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे एक लाख अंगणवाड्याची संख्या असली तरी या अंगणवाड्याद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नाही, वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही त्यांच्या सहा वर्षांपर्यंत होत असते, विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेंद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौध्दिक विकासाच्या दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा असल्याने यासाठी शिक्षण देण्यासाठी तज्ज्ञांची समिती गठीत करून विशेष कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४८) " शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते, त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. राजेश राठोड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४९ व ५१**

(४९) " विदर्भात नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५१) " राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्याप्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत जोडणी मिळण्याकरीता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अरुण लाड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५३ व ५५**

(५३) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यामध्ये रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५५) " महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, विद्यार्थ्यांच्या राज्यभर जिल्हास्तरीय क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक नाट्य, वादविवाद स्पर्धा शासनातर्फे आयोजित केल्या जातात, या विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था होत नसल्यामुळे स्पर्धेचे यशस्वी आयोजन होत नाही, त्यामुळे या विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, त्यांची होणारी गैरसोय टाळण्याकरिता व स्पर्धांचे आयोजन योग्यरितीने होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले विद्यार्थी भवन बांधून त्यांची योग्य ती देखभाल करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. विक्रम काळे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५७, ५८, ५९ व ६१**

(५७) " राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत आहे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५८) " राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटचांई कायमस्वरूपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५९) " राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक, प्रभावी होण्यासाठी आणि भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी सर्व शिक्षण विभाग (शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, आश्रमशाळा, अंध, अपंग, मूक-बधिर शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे मंत्रालयातील एकाच विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६१) " राज्यात सातत्याने वाढणारी लोकसंख्या, त्याच प्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या होणारे दररोजचे अपघात, त्यामुळे होणारी जीवितहानी हे टाळण्यासाठी राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्यमार्ग तसेच जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सतिश चव्हाण वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६२ व ६३**

(६२) " राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६३) " राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था विशेषतः मराठवाड्यातील शाळेच्या इमारती मोडकळीस आलेल्या अवस्थेत असून त्या विद्यार्थ्यांकरिता बसण्यायोग्य नसणे तसेच शाळांसाठी संरक्षित भिंत, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हापरिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**ॲड. निरंजन डावखरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६६ व ६८**

(६६) " थोर स्वातंत्र्यवीर, क्रांतिकारकांचे मुकुटमणी विनायक दामोदर सावरकर, महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, अशी शिफारस विनाविलंब केंद्र सरकारकडे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६८) " सिंधुदुर्ग जिल्ह्यास माहे एप्रिल, १९९७ मध्ये ' पर्यटन जिल्हा ' म्हणून जाहीर करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला प्रशस्त, सुंदर, निळाशार, सुरक्षित समुद्र किनारा व पुरातन ऐतिहासिक मंदिरे, देवस्थाने, गडकिल्ले, घनदाट अरण्ये, सृष्टीसौंदर्याची लयलूट, सण व लोककला आदी पर्यटनदृष्ट्या पोषक असलेल्या सर्व बाबींनी परिपूर्ण असा प्रदेश लाभला आहे. निसर्गरम्य कोकणात कोणत्याही ऋतुमध्ये केलेली भटकंती ही कायमच रमणीय असते. इतकेच नव्हे तर देशातील पर्यटन क्षेत्राचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी देशाचे मा. पंतप्रधान यांनी ' स्वदेश दर्शन ' ही महत्वाकांक्षी योजना यापूर्वीच हाती घेतली असून या योजनेत महाराष्ट्र राज्यातून सिंधुदुर्ग जिल्ह्याची निवड केलेली आहे. शेजारच्या गोवा तसेच केरळ या राज्यांनी देशविदेश पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध योजना राबविल्यामुळे ही राज्ये पर्यटनदृष्ट्या विकसित झालेली असून पर्यटनाच्या व्यवसायावर त्या राज्यांतील स्थानिक जनतेला मोठ्याप्रमाणात रोजगाराच्या संधीही प्राप्त झालेल्या आहेत. स्थानिक तसेच विदेशी पर्यटकांना निसर्ग, पर्यावरण, जैवविविधता, हस्तकला व सागरी किनाऱ्यांची भुरळ पडते. इतकेच नव्हे तर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रत्येक गावाचा पर्यटनातून विकास शक्य असून पर्यटनामध्ये सर्वात जास्त रोजगार देण्याची क्षमता आहे. कोकणचे नाव पर्यटनाच्या माध्यमातून जगाच्या नकाशावर जाईल यासाठी येथील पर्यटनाला चालना देण्याचे प्रयत्न व्हावयास हवेत. कोकणात पर्यटनासाठी नैसर्गिक क्षमता मुळात उपलब्ध असून ती वाढविण्याची तसेच पर्यटन स्थळाची प्रसिद्धी करण्याची व त्याव्दारे मोठ्याप्रमाणात रोजगार निर्मिती करण्याची गरज असतानाही पर्यटन व्यवसाय वाढविण्यासाठी

शासनाकडून आजमितीस आवश्यक ते प्रयत्न, उपाययोजना झालेली नाही. शासनाने गोवा, केरळ राज्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे."

**एकवीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी

**बावीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी अंतिम कार्यावली सोबत जोडण्यात येईल.)

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १८ फेब्रुवारी २०२१.

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई